**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२</u>** **<u>नि.फौ.ख.क्र.२७८/२०१६</u>**

**सरकार विरूध्द प्रितम**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – १७**

**माझे नाव – शैलेश हंसराज थुल**
**वय – अंदाजे ५२ वर्ष, व्यवसाय – खाजगी नोकरी**
**राहणार – न्यू खलासी लाईन, कामठी.**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जी. ओ. वर्मा यांच्या कडून**

दिनांक १३.०७.२०१६ रोजी पोलीसांनी मला बोलविले होते. पोलीसांनी माझे समक्ष कोणताही घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर अनुक्रमांक १ कडे माझी सही आहे. त्यातील मजकूर माहिती नाही. सहीस **<u>निशाणी १८</u>** देण्यात येते.

**(साक्षीदार हा त्याच्या पूर्वीच्या जबाबाप्रमाणे कथन करीत नसल्यामुळे त्यास सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

हे म्हणणे खरे नाही की दिनांक १३.०७.२०१६ रोजी पोलीसांनी माझे समक्ष कन्हान येथील के.एस.एम. गोडाउन येथे घटनास्थळ पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की तो पंचनामा मला वाचून दाखविला व तो बरोबर असल्याने मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे. फिर्यादी विशाल यांना मी ओळखतो, ते अटॅकने मरण पावले आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. कुशवहा व गजभिये यांचा पुकारा केला असता गैरहजर. आरोपीने उलटतपास नाकारला.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.11.25 17:51:04 +0530

कामठी
दिनांक २४/११/२०२५

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी